## सुभाष वारे

'छात्रभारती' संघटनेचा कार्यकर्ता म्हणून सुरू झालेली सुभाष वारेंची वाटचाल राष्ट्र सेवादलाच्या अध्यक्षपदापर्यंत झाली. समाजवादी विचारांच्या संस्था, संघटना व पक्षांना एकत्र आणून २००८ मध्ये महाराष्ट्रात स्थापन झालेल्या 'सोशलिस्ट फ्रंट'च्या स्थापनेत पुढाकार घेतला. विविध सामाजिक चळवळी–प्रश्न यांवर महाराष्ट्रात शेकडो प्रभावी व्याख्याने दिलेली आहेत. अफाट वाचन, सामाजिक प्रश्न आणि चळवळींचा सखोल अभ्यास, अनेकदा त्यातील प्रत्यक्ष सहभाग, लोकांना व कार्यकर्त्यांना समजून घेण्याची क्षमता इत्यादींमुळे व्याख्यानांचा चांगला प्रभाव.

किल्लारी भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संघर्षात्मक आंदोलन, गुजरात दंगलग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी कार्य, नर्मदा बचाव आंदोलनात सहभाग, अयोध्या संवादयात्रेच्या आयोजनात सहभाग, भीमाशंकरजवळील आदिवासी भागात तीन वर्षे काम, कॉपीविरोधी आंदोलन, फी–वाढ विरोधी आंदोलन, कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरांचे वेगळ्या पद्धतीने यशस्वी आयोजन.



**मनोगत**

**सुभाष वारे**



# शक्तिसंचयाचे काम करीत आहोत

**आम्ही अनेकजण ज्या उदारमतवादी, संवेदनशील, विवेकी आणि सामाजिक न्यायासाठी आग्रही अशा समाजाच्या निर्माणाचे स्वप्न पहात आहोत, ते आमचे स्वप्न आमच्यापासून दूरदूर जात आहे. हे वास्तव सतत मनाला इतके टोचत असते, की असे पुरस्कार स्वीकारताना आपण आपलीच फसवणूक करीत आहोत की काय, असा प्रश्न पडतो. म्हणूनच आजवर प्रामाणिकपणे धडपड केली त्यासाठी आणि पुढेही धडपड चालू ठेवण्याची इच्छा कायम रहावी, याकरिताचा प्रेरणा पुरस्कार अशा नम्र भावनेतून हा पुरस्कार मी स्वीकारत आहे.**

महाराष्ट्र फाऊंडेशन (अमेरिका) यांचा सामाजिक कार्य विभागातील समाजप्रबोधन पुरस्कार मला दिला जात आहे, याचा स्वाभाविकपणे मला आनंद वाटत आहे. माझे बी.फार्मसीचे शिक्षण संपल्याबरोबर दोनच वर्षांनी वयाच्या पंचविसाव्या वर्षी मी छात्रभारती या ग्रामीण बहुजन विद्यार्थी संघटनेचा पूर्णवेळ कार्यकर्ता झालो. अजूनही पूर्णवेळ कार्यकर्ता आहे आणि त्या निर्णयाबद्दल खंत तर सोडाच, पण वीस वर्षांपूर्वीची ऊर्मी आणि संवेदना अद्यापही तशीच असल्याने पुढेही पूर्णवेळ कार्यकर्ता राहणार आहे. माझी इथपर्यंतची वाटचाल माझ्या सर्व कुटुंबियांच्यामुळे आणि विशेषत: पत्नीमुळे नीट झाली, याची कृतज्ञ नोंद आवश्यक आहे. छात्रभारतीत माझ्यासोबत काम करणारे माझे अनेक युवक सहकारी मला आठवतात, ज्यांना पूर्णवेळ काम करण्याची संधी मिळाली असती, तर त्यांनी माझ्यापेक्षा अधिक सरस कामगिरी करून दाखविली असती; परंतु त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी आणि त्यांच्यावरील अपरिहार्य कौटुंबिक जबाबदाऱ्या यांमुळे त्या सर्वांनी अत्यंत नाईलाजास्तव नोकरी-व्यवसाय स्वीकारला. त्यांच्या जाणिवा आणि त्यांची ऊर्मी तेवढीच प्रभावी होती. सर्जनशीलता माझ्यापेक्षा अधिक होती; परंतु व्यावहारिक जगात टिकून राहण्यासाठी त्यांना जी तडजोड करावी लागली, त्यांतील अनेकांची घुसमट मी आजही अनुभवतो. म्हणून माझे कुटुबीय आणि पत्नीच्या योगदानाचा आवर्जून उल्लेख करीत आहे; कारण त्यांनी कधीही मला पैसे कमावण्याच्या जबाबदारीत अडकवले नाही, आणि घरातील अडचणींच्या प्रसंगी वेळ देण्याच्या जबाबदारीतूनही मला सतत मोकळेच ठेवले.

मी वीस वर्षे समाजवादी चळवळीत काहींना काही धडपड करीत राहिलो, एवढाच निकष हा पुरस्कार

देण्यापाठीमागे असावा असे मी मानतो; कारण धडपडीतून साध्य काय झाले, हा निकष जर लावला तर पुरस्कार दिला गेला असता की नाही, माहीत नाही. आम्ही अनेकजण ज्या उदारमतवादी, संवेदनशील, विवेकी आणि सामाजिक न्यायासाठी आग्रही अशा समाजाच्या निर्माणाचे स्वप्न पहात आहोत, ते आमचे स्वप्न आमच्यापासून दूर दूर जात आहे हे वास्तव इतके सतत मनाला टोचत असते, की असे पुरस्कार स्वीकारताना आपण आपलीच फसवणूक करीत आहोत की काय, असा प्रश्न पडतो. म्हणूनच आजवर प्रामाणिकपणे धडपड केली त्यासाठी आणि पुढेही धडपड चालू ठेवण्याची इच्छा कायम रहावी, याकरिताचा प्रेरणा पुरस्कार अशा नम्र भावनेतून हा पुरस्कार मी स्वीकारत आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील मी रहिवासी. हा तालुका मराठवाड्याच्या सीमेवर आहे. इथले सांस्कृतिक वातावरणही मराठवाड्यासारखेच. आजही हा भाग कायम दुष्काळी आहे. माझे शालेय

**माणसाने सुखी होण्याची अपेक्षा तर बाळगली पाहिजेच;
लोकशाही समाजवादी चळवळीचेही अंतिम उद्दिष्ट तेच आहे. परंतु माणसाने एकेकट्याने सुखी होणे योग्य नाही, हा नैतिक विचार आणि माणूस एकेकट्याने सुखी होणे शक्यही नाही, हा व्यावहारिक विचार मात्र हद्दपार होतो आहे. मानसिक समाधान देणाऱ्या सुखाची कल्पना समोर ठेवून त्याकरिता जी आवश्यक असेल, ती धडपड, ती मेहनत करण्याची तयारीही ठेवणे, हा विचार कालबाह्य मानला जातो आहे.**

शिक्षण इथेच झाले. मी जरी राष्ट्र सेवादलाचा राष्ट्रीय अध्यक्ष झालो असलो, तरी लहानपणी कधी राष्ट्र सेवादलाच्या शाखेवर जाऊ शकलो नाही. वास्तविक कॉलेजला जाईपर्यंत मला समाजवाद वगैरे काही माहीत नव्हते. वाचन मात्र भरपूर होते. मी अकरावीला शिकायला गेल्यावर दहावीला चांगले मार्क्स मिळालेले असूनही मला एक वर्ष शिक्षण सोडून घरी यावे लागले. त्याला अनेक कारणे होती. ग्रामीण भागातील विद्यार्थ्याला शहरी महाविद्यालयीन जीवनात सहजी स्वीकारले जात नाही. मी पुन्हा जेव्हा शिकायला अहमदनगरला आलो, तेव्हा ग्रामीण विद्यार्थ्यांचा गट/संघटना केली पाहिजे, या विचारानेच आलो, त्यातूनच छात्रभारती विद्यार्थी संघटनेशी माझी ओळख झाली. छात्रभारतीमुळे राष्ट्र सेवादलाशी ओळख झाली.

छात्रभारतीत आजही दलित, ओबीसी विद्यार्थ्यांचा दबदबा आहे. छात्रभारतीच्या माध्यमातून आणि अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने शिक्षणातील 'नाही रे' वर्गासाठी आम्ही अनेक उपक्रम राबविले/आंदोलने केली. रात्रशाळा विद्यार्थी आंदोलन, प्राथमिक शिक्षण सुधार लढा, दुष्काळग्रस्त विद्यार्थी फी-माफी आंदोलन, कॅपिटेशन फी विरोधी अभियान, नापास विद्यार्थी मेळावे, कॉपीविरोधी अभियान, अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. या सर्वांमुळे ग्रामीण कष्टकरी विद्यार्थ्यांचे अनेक शैक्षणिक प्रश्न मार्गी लागले. अशा अनेक मोर्चांनी आणि धरणे आंदोलनांनी माझे शिक्षण केले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या कामातून तरुण कार्यकर्त्यांचा एक संच तयार झाला. आज छात्रभारतीचे संगठन कमकुवत झाले आहे; परंतु १९८५ ते १९९५ या काळातील छात्रभारतीच्या वाटचालीत या सर्व आंदोलन/उपक्रमांच्या अनुभवातून तयार झालेले आमचे अनेक सहकारी आज राजकीय पक्ष, शिक्षणसंस्था, समाजवादी संस्था-संघटना, ग्रामीण विकास संस्था, असे कुठेना कुठे कार्यरत आहेत. छात्रभारतीचे हे यश फार मोठे आहे.

छात्रभारतीतला सक्रिय काळ संपल्यावर मी दोन वर्षे किल्लारी भूकंपग्रस्त भागात आणि तीन वर्षे भीमाशंकर आदिवासी भागात काम केले. या दोन्ही ठिकाणी जमीन स्तरावर लोकांसोबत काम करताना आलेल्या अनेक अनुभवांनी खूप शिकायला मिळाले. साधना साप्ताहिकाच्या 'व्यासपीठ' सदरात मी ते शब्दबद्धही केले आहे. किल्लारी भूकंपग्रस्तांसाठी काम करताना आम्ही

'पांगळे बनवणारी मदत नको; स्वाभिमानी बनवणारे पुनर्वसन हवे' अशी भूमिका घेत, ४० गावांत भूकंपग्रस्त युवा दक्षता समित्या स्थापन केल्या होत्या. शासनाच्या पुनर्वसन नीतीच्या विरोधात 'उपेक्षित भूकंपग्रस्त परिषद' घेऊन आवाज उठविला. त्यातून पुनर्वसन नीती काही प्रमाणात तरी बदलवायला आम्ही प्रशासनास भाग पाडले. गावांची नावे पुनर्वसनाच्या यादीत घेताना, केवळ गावात मृत्यू झाला की नाही, एवढाच नियम प्रशासनाने घेतला होता. त्यातून अनेक विसंगती तयार झाल्या. अनेक गावे अशी होती; की जिथे घरांचे नुकसान प्रचंड झाले होते; परंतु लोक एकमेकांच्या मदतीला धावल्याने गावात भूकंपामुळे मयत झाली नाही. जन्माचे जायबंदी अनेकजण होते. अशी गावे प्रशासनाच्या चुकीमुळे पुनर्वसनाच्या यादीत नव्हती. आमच्या आणि आणखी एक-दोन संघटनांच्या पाठपुराव्यामुळे या गावांनाही न्याय मिळाला. आम्ही आणखीही काही गोष्टींबाबत आवाज उठविला. उदाहरणार्थ, नव्याने पुनर्वसित गावात जातवार वस्त्या असू नयेत; चिठ्ठ्या टाकून घरे वाटावीत आणि मिश्रवस्त्या कराव्यात. किंवा मदतीचे वाटप 'सर्वांना समान' असे गणिती समानतेने न करता, गरजेनुसार करावे. अर्थातच, अशा मागण्यांना भूकंपग्रस्त ग्रामस्थांकडूनही अजिबातच प्रतिसाद मिळाला नाही.

आदिवासी भागातील विकासकामांनीही मला अनेक शहाणे करणारे अनुभव दिले. समाजकार्याचे पुस्तकी सिद्धांत आणि प्रत्यक्ष लोकांसोबत, त्यांना सक्रिय करीत सर्वांना एका भूमिकेवर आणत काम करणे यांत किती फरक असतो, याची जाण आदिवासी भागातील तीन वर्षांच्या कामाने आली.

राष्ट्र सेवादलाचे काम सर्वांना माहिती आहेच, आजच्या परिस्थितीत राष्ट्र सेवादलासारख्या संघटनेची फार आवश्यकता आहे. राष्ट्र सेवादल जोमाने वाढले पाहिजे. सुदैवाने आज साधने पुरेशी आहेत. मनुष्यबळाची मात्र उणीव आहे. आहे त्या मनुष्यबळाच्या दृष्टिकोनाचा प्रश्नही गंभीर आहे. खोट्या प्रतिष्ठेला आणि त्यातून आलेल्या पांढरपेशा दांभिकपणाला आजचा मध्यमवर्ग बळी पडला आहे. समाजातील कष्टकरी वर्गाच्या समस्यांबद्दल या मध्यमवर्गाने शहामृगी पवित्रा घेतला आहे. आजचा मध्यमवर्ग एकाच वेळी भाजप परिवाराच्या जमातवादी आणि कर्मकांडास प्रोत्साहन देणाऱ्या राजकारणाचा वाहक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या वस्तूंचा ग्राहक बनला आहे. राष्ट्र सेवादलास अशा प्रवृत्तीपासून दूर ठेवण्याचे मोठे आव्हान राष्ट्र सेवादलाच्या नेतृत्वासमोर आहे. स्वातंत्र्यलढ्याच्या काळातील राष्ट्रवादी चळवळीच्या भारलेल्या वातावरणात बहरलेल्या राष्ट्र सेवादलाने रूळ बदलून आता सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विषमताविरोधी चळवळीचे नेतृत्व केले पाहिजे, असे मला वाटते. हे होऊ शकले तर राष्ट्र सेवादल शाखा नव्या स्वरूपात पुढे येऊ शकतील. या शाखा नापास विद्यार्थ्यांच्या असतील, दगडखाण कामगारांच्या मुलांच्या असतील, मुख्य म्हणजे त्यांच्या जीवनातील अडचणींना साद घालणाऱ्या या शाखा असतील.

राष्ट्र सेवादलात काम करताना अनेक सहकाऱ्यांच्या मदतीने आम्ही नायगावचा महिला मेळावा, अयोध्यासंवाद यात्रा, गुजराथ दंगलग्रस्त मदत, गुजरात विधानसभा निवडणुकीत जमातवादी शक्तिविरोधी प्रचार अशी अनेक अभियाने राबविली. उत्तर प्रदेशामध्ये भाजपचे राजनाथसिंग मुख्यमंत्री असताना आणि विश्व हिंदू परिषदेचे 'राममंदिर बनाओ' आंदोलन ऐन भरात असताना आम्ही अयोध्येच्या परिसरात संवादयात्रा केली. ही आमची पदयात्रा म्हणजे 'अंधादौरा'च होता. म्हणजे कार्यक्रमाचे, जेवणाचे, निवासाचे काहीच नियोजन नव्हते. संवादाला माणसे आम्हीच जमवायची, जेवण आम्हीच मिळवायचे, रात्रीच्या निवाऱ्याची सोय ऐनवेळी करायची, अशा परिस्थितीत आम्ही चहाच्या टपरीवर, रेल्वे स्टेशनवर, बसअड्ड्यांवर, महिला बचत गटांच्या शिबिरात, ग्रामपंचायत सदस्यांच्या मेळाव्यात, खेळाच्या मैदानावर जाऊन लोकांशी संवाद साधला, तोही अनोळखी आणि परक्या प्रदेशात.

'मंदीर नही पाणी चाहिये, मस्जीद नही शिक्षा चाहिये' हा आमचा विचार या पदयात्रेत आम्ही अनेक समूहांच्या गळी उतरवू शकलो. हा अनुभव अतिशय जिवंत आणि आमचंही कार्यकर्तेपण समृद्ध करणारा ठरला.

गुजराथ दंगलग्रस्तांसाठी मदत असो, की त्यानंतरच्या निवडणुकीत थेट भाजपविरोधी किंवा नरेंद्र मोदीविरोधी प्रचार असो, आमचे सहकारी अनेक अडचणींच्या, तणावाच्या प्रसंगांना सामोरे गेले. निवडणुकांत राजकीय पक्ष एकमेकांच्या विरोधात प्रचार करतात. पण संघटनांच्यापैकी भाजपच्या थेट विरोधात पोस्टर छापून प्रचाराला उतरलेली राष्ट्र सेवादल ही एकमेव संघटना असेल. हे आम्ही केले ते गुजराथ दंगलीनंतरच्या विषारी आणि हिंसक वातावरणात. कार्यकर्ते शिबिरापेक्षाही मोर्चा, धरणे आंदोलन आणि अशा सक्रिय अभियानातूनच नीट घडतात.

आज आम्ही सोशलिस्ट फ्रंट उभी करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. सोशलिस्ट फ्रंट हे समाजवादी संस्था-संघटना आणि पक्षांचे व्यासपीठ आहे. सोशलिस्ट फ्रंटच्या मंचावर या सर्व संस्था-संघटना आणि पक्षांनी एकत्र यावे, त्यांच्यातील समन्वय वाढावा, त्यांनी परस्परपूरक बनावे. या परस्पर भूमिकेतून सर्वांचाच प्रभाव वाढावा असा सोशलिस्ट फ्रंटचा उद्देश आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनावर आजही समाजवादी संस्था, जनआंदोलने यांचा प्रभाव आहे. आम्ही निवडणुकीच्या राजकारणात ताकदवान नसलो तरी शिक्षणसंस्था, ग्रामीण विकास संस्था, आदिवासी विकास संस्था, अंधश्रद्धा निर्मूलन, सहकारी संस्था अशा अनेक क्षेत्रात समाजवादी विचारांच्या कार्यकर्त्यांचे काम आहे. केवळ जनआंदोलने हा एक विभाग घेतला तरी विदर्भात विलास भोंगाडे, सुरेश डांगे, इकलाकभाई कुरेशी... मराठवाड्यात सुभाष लोमटे, रामकुमार रायवाडीकर, संजय लकडे..., कोकणात उल्का महाजन, सुरेखा दळवी, राजन इंदूलकर..., खानदेशात प्रतिभा शिंदे, अविनाश पाटील, चंद्रकांत चौधरी..., प.महाराष्ट्रात- मानव कांबळे, मारुती भापकर, निशा शिवूरकर... जोडीला वीजग्राहकांच्या प्रश्नावर लढणारे प्रताप होगाडे, शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या समस्येवर काम करणारे शिवाजी परुळेकर, शहरी गरिबांच्या निवाऱ्याच्या संदर्भात काम करणारे वसंत शिराली, माफिया-गुंडांच्या विरोधात वसई परिसरात निर्भय आंदोलन चालविणारे मनवेल तुस्कानो, गिरणी कामगारांचे प्रभावी संगठन चालविणारे दत्ता इस्वलकर अशी कितीतरी नावे घेता येतील. आज महाराष्ट्रात कोणत्या विचारधारेकडे पन्नाशीच्या आसपासच्या वयातील असे लढवय्ये साथी आहेत? लोकशाही समाजवादी चळवळीची ही केवढी ताकद आहे? सोशलिस्ट फ्रंट अशा सर्व लढवय्या साथींना एकत्र आणून त्यांची परिणामकारकता वाढविण्यासाठी आहे. नजिकच्या भविष्यकाळात हे व्हावे, यासाठी प्रयत्नशील राहण्याचा माझा मानस आहे.

समाजवादी चळवळ प्रभावशाली बनविण्यात आव्हाने अनेक आहेत. बाहेरच्या परिस्थितीची आव्हाने सर्वांनाच माहिती आहेत. आम्ही आमच्या सवयी, पद्धती, उपक्रम यांत कसा बदल करतो हे आंतरिक आव्हान महत्त्वाचे आहे.

आम्ही ज्या लोकशाही समाजवादी चळवळीचे काम करत आहोत, त्या चळवळीसमोरील आणि समाजातील विवेकी व संवेदनशील अशा प्रवृत्तींसमोरील आव्हाने एकच आहेत, असे मी मानतो.

लोकसंख्या वेगाने वाढते आहे आणि वाढत्या लोकसंख्येच्या इच्छा-आकांक्षा त्यापेक्षा दुप्पट वेगाने वाढत आहेत. माणसाने सुखी होण्याची अपेक्षा तर बाळगली पाहिजेच; लोकशाही समाजवादी चळवळीचेही अंतिम उद्दिष्ट तेच आहे. परंतु माणसाने एकेकट्याने सुखी होणे योग्य नाही, हा नैतिक विचार आणि माणूस एकेकट्याने सुखी होणे शक्यही नाही, हा व्यावहारिक विचार मात्र हद्दपार होतो आहे. मानसिक समाधान देणाऱ्या सुखाची कल्पना समोर ठेवून त्याकरिता जी आवश्यक असेल, ती धडपड, ती मेहनत करण्याची तयारीही ठेवणे, हा विचार कालबाह्य मानला जातो आहे. सुखाच्या स्वाभाविक इच्छा-आकांक्षाचे रूपांतर उपभोग आणि वासनेच्या स्वरूपात पुढे आणून त्याच्या प्राप्तीकरिता धावाधाव करा; ऊर फुटेस्तोवर धावा आणि ते मृगजळी सुख आवाक्यात येत नाही, असे वाटले तर गळेकापू स्पर्धेत उतरा. त्यात आडवे येणाऱ्यांना तुडवून, भोवतालच्या तीनचार जणांचा ज्यावर नैसर्गिक अधिकार आहे तो हिसकावून घ्यावा, पण आपल्या इच्छा वासना पूर्ण कराव्यात, या दिशेने समाज जातो आहे, याचे वाईट वाटतेच; परंतु अधिक वाईट याचे वाटते, की हेच बरोबर आहे अशी मान्यता या गळेकापू स्पर्धेला मिळत आहे त्याचे!

तरीही मग आम्ही काम करतो ते कुठल्या आशेवर? आज जगात दोन प्रकारची माणसे आहेत. एक गट आहे डार्विनचा उत्क्रांतिवाद खरा ठरविणाऱ्यांचा आणि दुसरा गट आहे डार्विनचा उत्क्रांतिवाद खोटा ठरविणाऱ्यांचा. डार्विन असे म्हणतो, की माणूस हा मूलत: प्राणिसृष्टीचाच एक भाग होता. जंगलात आदिमानव म्हणून वावरताना जंगलातील प्राण्यांचे, जनावरांचे सर्वच गुणधर्म या माणूसप्राण्याच्याही ठायी होते. विकासक्रमात एकच महत्त्वाचे वेगळेपण या माणूसप्राण्यात निर्माण झाले, ते म्हणजे विचार करण्याची शक्ती. पण या विचार करण्याच्या शक्तीनेच फार फरक पडला; कारण त्यामुळे माणसाचा उत्क्रांतीचा प्रवास सुरू झाला. उत्क्रांतीच्या प्रवासात माणसाने प्राणीअवस्थेचा एक एक गुणविशेष सोडून देत माणूसपणाचा एक एक गुणविशेष अंगिकारायला सुरुवात केली. माणसाचा माणूसपणाचा हा प्रवास अजून अपूर्ण आहे; परंतु प्राणिसृष्टीशी तुलना केली तर माणूसपणाचा हा प्रवास थक्क करणाराही आहे आणि आशादायक तर नक्कीच आहे.

यामध्ये दोन गडबडी झाल्या. प्राणीअवस्थेचे गुणधर्म सोडून देणे आणि माणूसपणाचे गुणधर्म अंगीकारणे हा प्रवास सर्वच माणसांच्या बाबतीत सारख्याच गतीने झाला नाही. काहींनी त्यात आघाडी घेतली आणि ते विवेकी व संवेदनशील समाजनिर्मितीचे पुरस्कर्ते बनले. प्राणीअवस्थेचे गुणधर्म सोडण्याबाबत काहीजण जरा जास्तच मागे राहिले आणि ते डार्विनच्या उत्क्रांतीवादातील 'सर्व्हायवल ऑफ दि फिटेस्ट' या सिद्धांताचे 'बळी तो कान पिळी' असे चुकीचे भाषांतर करून त्याचेच समर्थक बनले. माणूसपणाचे गुणधर्म स्वीकारण्यातही मागेच राहिलेल्या या मंडळींनी डार्विनचा उत्क्रांतीवाद खोटा ठरविला; तो अशा अर्थाने, की समाजात साधने आणि संधी यांची कमतरता निर्माण होऊन स्पर्धा वाढल्याबरोबर प्राणीअवस्थेचे जे गुणधर्म या मंडळींनी पूर्वी सोडले होते, ते गुणधर्म त्यांनी पुन्हा स्वीकारले (यालाच प्रतिक्रांती म्हणावे का?) आणि आपल्याच पोळीवर तूप ओढण्याच्या प्रवृत्तीला बढावा द्यायला सुरुवात केली. अशी ही आजची लढाई डार्विनचा उत्क्रांतीवाद खोटा ठरविणारे विरुद्ध डार्विनचा उत्क्रांतीवाद खरा ठरविणारे यांच्यातील आहे, पण माणूस मूलत: प्राणीच होता, हे वास्तव एकदा स्वीकारले, की त्याचा माणूसपणाच्या दिशेने आजवर झालेला प्रवास, या प्रवासातील त्याच्यासमोरील अडथळे-संकटे आणि विचार करण्याच्या शक्तीच्या आधारे त्याने या संकटाचा केलेला मुकाबला, हा सर्व इतिहास नीट अभ्यासला की विवेकाचा आणि संवेदनशीलतेचा हा प्रवास पुढेपुढे आणि पुढेच जात राहील, यावर आमच्यासारख्यांचा विश्वास वाढतो. आम्ही हे काम का करतो, याचा हा झाला एक आधार!

आमच्या आशावादाला आणखीही एक कारण आहे- राजकीय, सामाजिक जीवनात आपण कल्पना करू शकत नाही अशा गोष्टीही घडत असतात. अमेरिकेच्या बरोबरीने एक महासत्ता म्हणून ओळखला जाणारा रशिया (यु.एस.एस.आर.) कोलमडून पडेल आणि त्याचे अनेक देशांत तुकडे होतील, यावर सत्तरच्या किंवा ऐंशीच्या दशकात कोणी विश्वास ठेवला असता का? आणि याच्याबरोबर उलट जगभर फाटाफूट आणि विघटनाचे वारे वाहत असताना भांडवलशाहीचा पुरस्कार करणारा प.जर्मनी आणि साम्यवादाचा झेंडा खांद्यावर घेतलेला पूर्व जर्मनी, हे बर्लिनची भिंत तोडून एक होतील यावरही कुणी विश्वास ठेवला असता का? परंतु हे घडले. सामाजिक परिवर्तन हे नेहमीच आपल्या अपेक्षेनुसार आणि सरळ रेषेत पुढे पुढे जात नाही. ते नेहमी पाच पावले पुढे तर दोन पावले मागे, अशीच वाटचाल करते. पाच पावले पुढे जाणे त्या काळाला राज्यशास्त्रात क्रांती म्हणत असावेत आणि दोन पावले मागे येणे याला प्रतिक्रांती म्हणत असावेत; पण या आवर्तनाचा अंतिम परिणाम शेवटी तीन पावले पुढे जाण्याचा असतो. आपण आज कदाचित दोन पावले मागे येण्याच्या कालखंडात जगत असू; म्हणून काय पुन्हा पाच पावले पुढे जाण्याचा कालखंड येणार नाहीच की काय? 'सौ सुनारकी और एक लुहार की' अशी एक म्हण आहे. समाज मागे येण्याच्या कालखंडात जे जगत असतात त्यांच्यावर 'सौ सुनारकी'ची जबाबदारी असते. आपण घालत असलेल्या घावाने काही होत नाही, असे वाटून त्यांनी थांबायचे नसते. 'सौ सुनारकी' असते म्हणून 'एक लुहारकी'ला अर्थ असतो. प्रतिक्रांतीच्या काळात विवेकी आणि संवेदनशील प्रवृत्तींनी शक्तिसंचय करीत राहणे आणि अंतिम घाव घालण्याची संधी कधी येते, याची वाट बघणे हेही महत्त्वाचे असते. आजच्या निराशाजनक परिस्थितीत आम्ही जर शस्त्रेच टाकून दिली, तर भविष्यात पाच पावले पुढे झेप घेण्याची संधी निर्माण होईल, तेव्हा आमच्या हातापायात त्राणही नसेल. त्याकरिता आम्ही आज शक्तिसंचयाचे काम करीत आहोत.

**सुभाष वारे**

बी ५/१३, गंगा रेसिडेन्सी, मंत्री मार्केटच्या मागे,
सोलापूर रस्ता, हडपसर, पुणे ४११०२८.
दूरध्वनी : (०२०) २६८७४७१५
मोबा. ९८२२०२०७७३

ओळख

**बाबा आढाव**

# हरळीचे मूळ

एस.एम.जोशी फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमीचे सचिव प्रा.सुभाष वारे ४५ वर्षांचे आहेत. ते फार्मसी विषयाचे पदवीधर आहेत. कराडच्या फार्मसी महाविद्यालयात त्यांनी प्राध्यापकी केली आहे. पदवीसाठी स्वीकारलेला विषय त्यांच्या हातून आता सुटला असला, तरी प्राध्यापकीचे बिरुद मात्र कायम लाभले आहे.

फाऊंडेशन व अकादमी या शब्दांचे भाषांतर 'प्रतिष्ठान' व 'प्रबोधिनी' असे करता येईल. लोकशाही समाजवादी चळवळीत ज्यांनी आयुष्य वेचले त्या एस.एम.-नानासाहेब यांच्या नावाने चालणाऱ्या संस्थेत 'प्रतिष्ठान व प्रबोधिनी' हे शब्द साकार करण्याचे अत्यंत अवघड पण आवश्यक काम प्रा.सुभाष वारे करीत आहेत. समाजवादी पक्ष राजकीय पातळीवर नामोहरम झालेला असला तरी समाजवादी चळवळ हरळीच्या मुळाप्रमाणे तग धरून आहे. दिवंगत नानासाहेब गोरे यांनी समाजवादी कार्यकर्त्याला हरळीच्या मुळाची उपमा दिलेली आहे. राष्ट्र सेवादलाचे संस्थापक एस.एम.जोशी यांनी राष्ट्र सेवादलाकडून लोकशाही समाजवादी शीलाच्या आदर्श नागरिकांची निर्मिती अपेक्षिली.

यातील 'समाजवादी शील' हा शब्द अधोरेखित करावा असा आहे. तो 'व्यक्तिगत' स्वरूपात असला तरी समाजवादी संस्कृती असल्याशिवाय त्याचा विचार केवळ व्यक्तिगत पातळीवर करता येणार नाही. लोकशाही समाजवादी चळवळ तळागाळात नेण्यासाठी सतत संपर्क, संवाद, चिंतन, मनन, उपक्रम, संघर्ष-संघटन- थोडक्यात चळवळ सांस्कृतिक पातळीवर नेण्याचे जबरदस्त आव्हान खडे आहे. एखाद्या मानवी संस्कृतीचा विचार करताना बर्टांड रसेल या तत्त्वज्ञाने कलात्मक सर्जनशीलता व चिंतनशीलता हे दोन निकष सांगितले. रसेलच्या डोळ्यांपुढे समृद्ध युरोपियन संस्कृती होती. या निकषावर भारतीय संस्कृतीचे मूल्यमापन परखडपणे व्हावयास हवे. भारतासारख्या विषमतावादी परंपरा असलेल्या भूमीत समतेचा विचार रुजवल्याशिवाय समाजवादी समाजरचना साकार होऊ शकणार नाही. एऱ्हवी साहित्य, कला, संस्कृती विषमतेच्या अंगानेच फुलणार, याचे भान अनेकांना नसते. प्रा.सुभाष वारे यांच्याजवळ ते आहे. त्याचबरोबर विचारांची सुस्पष्टता व बांधिलकी आहे. विचारांच्या प्रक्रियेत गतिमान्यता आहे. सध्याच्या वैज्ञानिक जगात माहितीची उपलब्धता फार झपाट्याने होते. या नव्या प्रवाहाशी फाऊंडेशन जुळलेले आहे. पुण्यात तशा अनेक संस्था, संघटना मंडळे आहेत, काहींचा प्रभाव ओसरला आहे. फार थोड्या अवधीत एस.एम.जोशी फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमी ही संस्था नावारूपाला आली आहे. नेत्यांच्या नावाच्या काही संस्थांचे व्यावसायीकरण झाले आहे. फाऊंडेशन-अकादमीने मात्र आपले चारित्र्य जपले आहे. सुभाष वारे हे त्याचे प्रतीक मानावे लागेल.

अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड गावात त्यांचे प्राथमिक-महाविद्यालयीन शिक्षण झाले. महाविद्यालयीन शिक्षणात त्यांना अहमदनगरचा अनुभव घ्यावा लागला. शैक्षणिक खर्च न परवडल्याने एक वर्ष शिक्षण सोडून गावी परतावे लागले. वडील शिक्षक, घरची परिस्थिती हलाखीची नसली तरी गरिबीची. १९७२ सालच्या दुष्काळात रोजगार हमीतील 'सुकडी' त्यांनी चाखली आहे. बारावी नंतर कराडच्या फार्मसी महाविद्यालयातून त्यांनी 'पदवी' संपादन केली. कराडच्या महाविद्यालयात ते प्राध्यापक झाले; विद्यार्थी चळवळीत ओढले गेले. ग्रामीण भागातून शिक्षणासाठी शहरात आलेल्या गरीब विद्यार्थ्यांचे हाल त्यांनी अनुभवले असल्याने विद्यार्थी आंदोलनात त्यांनी जीव ओतला. छात्रभारती संघटनेत त्यांनी काम केले. अनेक सहकाऱ्यांच्या समवेत छात्रभारती संघटनेची उभारणी झाली. त्यातूनच निष्ठावान समाजवादी तरुण कार्यकर्त्यांचा जथ्था तयार झाला. वारेसरांनी नोकरी सोडून स्वत:ला, संघटनेला पूर्णवेळ वाहून घेतले. किल्लारी, कच्छचे भूकंप, गुजराथेतील दंगल इत्यादी कामांत झोकून दिले. भाई वैद्य यांच्यासारख्या नेत्याने त्यांचे गुण व जीवनसमर्पण हेरले. राष्ट्र सेवादलाच्या अध्यक्षपदावर त्यांची निवड झाली. ते अध्यक्षपद त्यांनी चार वर्षे सांभाळले. राष्ट्र सेवादलाच्या कामात 'जान' आणण्याची त्यांनी पराकाष्ठा केली. या कामातील त्यांच्या

यशापशयाबद्दल तेच बोलू शकतील. एखादी चळवळ, संघटन, संस्था इत्यादी कामांत केवळ विचारांवर भागत नाही, मानवी स्वभावाचे अनेक कंगोरे लक्षात घ्यावे लागतात. एरवी मतभेदाचे रूपांतर अहंकारात कधी होईल ते सांगता येत नाही. समाजवादी चळवळीला फाटाफुटीचा शाप आहे, त्यामागे 'स्वभाव' हा मुद्दा प्रकर्षाने जाणवतो. त्यांच्या कामाला एक प्राकृतिक मर्यादा आहे. त्यांच्या फुफ्फुसाची एक बाजू लहानपणापासून निकामी आहे. आजाराचे वेळीच निदान न होणे व झाल्यावर उपचारखर्च न झेपणे- यांतून दुबळ्या फुफ्फुसाची साथ त्यांना जन्माची झाली आहे. अशा अवस्थेतही नंदाने त्यांची आयुष्यभर साथ करण्याचा निर्णय घेतला. ती एका संस्थेत तात्पुरती शिक्षिका आहे. दोघांनाही इला नावाची छान मुलगी आहे. यंदा ती आठवीत आहे. वारेसरांचे दोन भाऊ डॉक्टर आहेत. बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात एका बंधूंचे रुग्णालय आहे. वारेसर अधूनमधून जातात. सर्व भावंडे प्रेमाचा वर्षाव करतात. त्यांना वारे सतत सांगतात- 'माझ्या विचारांवरही प्रेम करा.' त्यांच्या सांगण्यात आपलेपणा, आर्जव असते.

वारेसर राष्ट्र सेवादलाचे अध्यक्ष झाल्याबरोबर त्यांचे मित्र व सहकारी राजू बहाळकरांनी नोकरीचा राजीनामा देऊन सर्ववेळ कार्यकर्ता बनण्याचा भार अंगावर घेतला. राष्ट्र सेवादलाच्या चळवळीत पिढ्यांचे अंतर पडलेले. छात्रभारतीमुळे हे अंतर कमी करण्याचा प्रयत्न झाला. 'वाऱ्यांनी' असे अनेक प्रवाह एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या ऋजु स्वभावामुळे प्रतिसादही लाभला. राष्ट्र सेवादलाचे संघटन अखिल भारतीय आहे. उत्तर प्रदेश, बिहारमधील जुन्या समाजवाद्यांना सेवादलाचे आकर्षण आहे, परंतु त्यासाठी समर्पणाची तयारी नाही. त्यांतील अनेकांनी जागोजाग विधायक कामांचे मळे फुलवले आहेत. सामाजिक सुरक्षा कायदा व जयपूर उच्च न्यायालयातील 'मनू पुतळा हटाव' मोहिमेत झालेल्या पदयात्रेत आम्हांला ही कामे जवळून पाहता आली आहेत. 'हल्लीची मुले' हा शब्दप्रयोग किती सार्थ आहे, हे लक्षात आले आहे.

एस.एम.जोशी फाऊंडेशन व नानासाहेब गोरे अकादमीत वारेसरांनी जाणीवपूर्वक डावे, दलित, शूद्रातिशूद्र, युवकादी संघटनांशी भाईचारा निर्माण केला आहे. संयुक्त महाराष्ट्र समितीत एस.एम.जोशी हे सर्वांचे स्नेही मानले जात. वारेसरसुद्धा ही भूमिका वठवीत आहेत. लोकशाही समाजवादी चळवळीला बहर यावा यासाठी ते धडपडत आहेत. प्रकृतीची साथ मर्यादित आहे, मात्र जिद्द अफाट आहे.

फाऊंडेशन व अकादमी या शब्दांमागचा आशय कृतीतून स्पष्ट व्हावा, यासाठी अनेक उपक्रम संस्था चालविते. या कामाला खऱ्या अर्थाने प्रबोधिनीचे स्वरूप यावे; समाजवादी कार्यकर्त्यांसाठी ते संवाद-संशोधन शिक्षण केंद्र बनावे, अशी सरांची धडपड आहे.

रचनात्मक संघर्ष असा शब्दप्रयोग राष्ट्र सेवादलात वापरला जातो. केवळ विधायक कार्य नव्हे, तर मूल्ये रुजवण्यासाठी मूलभूत क्रांती. क्रांती या शब्दाला अनेकांनी अनेक विशेषणे बहाल केली आहेत. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात सर्व आधुनिक जीवनमूल्यांचा स्वीकार झालेला आहे. मार्गदर्शक तत्त्वांच्या यादीत त्यांचा समावेश आहे. परंतु संविधानाच्या ६० वर्षांत ही मूल्ये रुजवली गेली नाहीत. उलट त्यांना विरोध झाला, ही बाब परिवर्तनवाद्यांना सतत खटकते.

राजकीय पक्ष व राजकारण 'जैसे थे'वादी भूमिका घेतात. काहीवेळेस उलटही वाटचाल होते. केवळ रचनात्मक कार्य वारेसरांना अभिप्रेत नाही. राजकारण- राजकीय सत्तेबद्दल ते सतर्क आहेत. 'सोशलिस्ट फ्रंट' मजबूत व्हावी, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. समाजवादी चळवळीतील तरुणाईला त्यांनी एकत्र आणले. छात्रभारती, राष्ट्र सेवादल, सोशलिस्ट फ्रंट अशी त्यांची वाटचाल आहे.

सध्या आघाड्यांच्या राजकारणाचा जमाना आहे. 'जैसे थे वाद' आपोआप येतो. मुक्त अर्थव्यवस्था, आघाड्या- यांत परिवर्तनाचा 'प्राण' कासावीस होतो. सतत संघर्षाची धडपड करावी लागते. ती धडपड अनेक आघाड्यांवर करावी लागते. जातीयवाद व राष्ट्रीय एकात्मता, आर्थिक-सामाजिक विषमता, तरुणांची बेरोजगारी, वाढता भ्रष्टाचार, काळा पैसा व माफियांचे संघटन, तरुणाईशी तुटलेला संवाद, शेतकरी, शेतमजूर, असंघटित स्त्री-पुरुष कष्टकरी, परित्यक्ता, वेशीबाहेरचे जग अशा कितीतरी आघाड्यांवर झुंजावे लागत आहे. नवनवे पर्याय शोधावे लागत आहेत. वारेसरांनी वाऱ्याची दिशा ओळखली आहे.

**बाबा आढाव**
'अंबर', नवमित्र हौसिंग सोसायटी,
बिबवेवाडी, पुणे ४११०३७.
दूरध्वनी : (०२०) २६४५७३०७.